# प्रशासन-लोकप्रतिनिधी सुसंवाद आवश्यकच

## अश्विनी भिडे यांचे प्रतिपादन




'लोकसत्ता परिवार' उपक्रमाअंतर्गत मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मेट्रो-३ प्रकल्पाची वाटचाल आणि फायदे यांचा आढावा घेतला. 'लोकसत्ता'चे साहाय्यक संपादक सौरभ कुलश्रेष्ठ यांनी त्यांच्याशी संवाद साधला. 'लोकसत्ता'स्नेही वाचकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त दाद दिली. (छाया : दिलीप कागडा)

**विशेष प्रतिनिधी, मुंबई**

**लोकप्रतिनिधींना-राजकीय** नेत्यांना स्थानिक जनतेची नस माहिती असते. लोकांमध्येही त्यांच्याबद्दल एक स्वीकारार्हता असते. प्रकल्प राबवताना, सरकारी योजना राबवताना स्थानिक लोकप्रतिनिधींसह संवाद असला तर कामे सोपी होतात, असा आजवरच्या प्रशासकीय सेवेत अनुभव आला असून लोकशाही व्यवस्थेत प्रशासन-लोकप्रतिनिधी सुसंवाद आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी 'लोकसत्ता'च्या कार्यक्रमात केले.

वाचक-मान्यवरांचा अनौपचारिक संवाद असलेल्या लोकसत्ता परिवार या उपक्रमात अश्विनी भिडे बोलत होत्या. त्यांच्या संवाद साधण्यासाठी सभागृह तुडुंब भरून गेले होते. 'लोकसत्ता'चे वरिष्ठ साहाय्यक संपादक सिद्धार्थ खांडेकर यांनी प्रास्ताविकात या उपक्रमामागील भूमिका विशद केली. अश्विनी भिडे यांनी आपली आजवरची भारतीय प्रशासन सेवेतील कारकीर्द, गेल्या दहा वर्षांत मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्प राबवताना आलेले अनुभव, मुंबईत सुरू असलेल्या मेट्रो-३ या भुयारी प्रकल्पाचे स्वरूप, त्याची प्रगती आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्याचे मुंबईकरांना मिळणारे लाभ अशा विविध विषयांवर तपशीलवार गप्पा मारल्या. 'लोकसत्ता'चे साहाय्यक संपादक सौरभ कुलश्रेष्ठ यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

वाचकांच्या प्रश्नांना भिडे यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. पूरस्थिती असो की भूकंपासारखे संकट सर्व गोष्टींचा विचार करून त्यानुसार मेट्रो-३ या भुयारी प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. मोठ्या पावसात उपनगरी रेल्वे बंद पडली तरी मेट्रो-३ सुरू राहील, अशी ग्वाही भिडे यांनी मुंबईकरांना दिली.

'माहितीची देवाण-घेवाण होणे हे लोकशाहीत महत्त्वाचे असते. माहिती लपवली गेली किंवा ती नीट पोहोचली नाही तर योग्य माहितीच्या अभावी गैरसमज-अविश्वास निर्माण होतो. त्यातून प्रकल्पांना विरोध, न्यायालयीन खटले असे विविध प्रकार घडतात. लोकप्रतिनिधी, राजकीय नेतेमंडळींची महत्त्वाची भूमिका असते. त्यांना विश्वासात घेऊन, संवाद साधला तर ही मंडळी चांगल्या कामासाठी मदत करतात. लोकांना समजावण्याची त्यांची क्षमता ही प्रशासनापेक्षा जास्त असते. आपण लोकांच्याच भल्याचे करत आहोत मग यांना कशाला समजावत बसायचे ही भूमिका चुकीची ठरते. प्रशासन-लोकप्रतिनिधी संवाद असेल तर अनेक प्रश्न सुटतात, प्रकल्प मार्गी लावण्यात मदत होते,' असे भिडे यांनी स्पष्ट केले. मेट्रो-३ प्रकल्पाला सुरुवातीला विरोध सुरू झाल्यावर विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी, स्थानिक लोकप्रतिनिधींशी संवाद साधल्यावर गैरसमज कसे दूर झाले, ती मंडळी कशी मदतीला पुढे आली, याचे किस्सेही भिडे यांनी सांगितले. मुंबई मेट्रो-३ या प्रकल्पातील भुयारे खणण्याचे, स्थानके बांधण्याचे काम प्रगतिपथावर असून २०२१ पर्यंत हा प्रकल्प मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल, अशी माहितीही भिडे यांनी दिली.

सनदी अधिकारी व्हायचे असे काही निधाईर केला नव्हता. ग्रामीण भागात राहत असल्याने त्याबद्दल फारशी माहितीही नव्हती. बोर्डात आल्यावर वाचनाच्या-साहित्याच्या आवडीतून कलाशाखेची निवड करायचे ठरवले तेव्हा नातेवाईकही चकित झाले. पण चाकोरीबाहेरचे क्षेत्र निवडायचे होते. त्यातूनच आयएएस परीक्षा द्यायचे ठरले आणि त्यात यश मिळाले. त्यानंतर सुरुवातीच्या काही वर्षांनंतर राजभवनमध्ये राज्यापालांच्या कार्यालयात नेमणूक झाली. त्या वेळी अनुशेषाच्या विषयावर काम करण्याची संधी मिळाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून काम करताना पायाभूत सुविधा प्रकल्पांचे काम करण्याची संधी मिळाली. त्यातून पूर्व मुक्त मार्ग, घाटकोपर-वर्सोवा मेट्रो रेल्वेसह विविध उड्डाणपुलांचे काम करण्याचा अनुभव आला. त्या सगळ्याचा मुंबई मेट्रो-३ प्रकल्पाचे काम करताना खूप उपयोग होत आहे, अशा शब्दांत भिडे यांनी आपला प्रवासही उलगडून सांगितला.

### तणावमुक्तीसाठी...

कुटुंबासह वेळ घालवणे, वाचन यातून कामातून येणारा तणाव दूर होतो. मुळातच साहित्याची आवड असल्याने ललित साहित्य, माहितीपर-वैचारिक पुस्तके वाचायला आवडते. त्यातून विरंगुळाही होतो आणि कामाची दगदग, त्यातून येणारे ताणतणावतून मुक्त होता येते, असे भिडे यांनी सांगितले.

### 'लोकसत्ता परिवार' उपक्रम

'लोकसत्ता'च्या निर्भीड आणि निःपक्षपाती पत्रकारितेच्या बाजूने नेहमीच उभ्या राहणाऱ्या स्नेही वाचकांसाठी 'लोकसत्ता परिवार' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यापूर्वी 'संगीत देवबाभळी' आणि 'अनन्या'सारखी दर्जेदार नाटके वाचकांना दाखवण्यात आली होती. आता त्याबरोबरीने समाजातील यशस्वी, प्रतिष्ठित, महत्त्वाच्या व्यक्तींबरोबर अनौपचारिक वार्तालाप घडवून आणले जातील, ज्यायोगे अशा व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व, त्यांची वाटचाल यांविषयी वाचकांना अधिक मौलिक माहिती मिळू शकेल. वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक अभिसरणाविषयी 'लोकसत्ता'च्या बांधिलकीशी हे सुसंगतच आहे.